(१)

# प्रथम भाषा : मराठी

इ - ६वी - ४०+१०=५०

## प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र

### शैक्षणिक प्रगती चाचणी: संकलित मूल्यमापन १ - २०१८-१९

### इयत्ता: सातवी - विषय - मराठी (लेखी)

विद्यार्थ्यांचे नाव: हजेरी क्रमांक ☐

शाळेचे नाव तुकडी - ☐

केंद्र: ता: जि: दिनांक: / /२०१८

| | लेखी | | | | | | | तोंडी | | प्राप्तगुण | | | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | मूलभूत क्षमता | इयत्तेच्या क्षमता | एकूण | |
| प्राप्तगुण | | | | | | | | | | | | | |
| कमाल गुण | ५ | ५ | ५ | ५ | १० | ५ | ५ | ५ | ५ | | | ५० | |

प्रश्न १ला शब्द ऐकून लिही. गुण - ५

१) २)

३) ४)

५) ६)

७) ८)

९) १०)

प्रश्न २रा - खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

तो आणि त्याची आई याशिवाय घरी तिसरे कोणी नव्हते. एका झोपडीवजा घराशिवाय त्यांच्याकडे काही नव्हते. दवाखान्यात आईजवळ सतत बसून राहण्याचा त्याला कंटाळा येई. आईला विचारून तो इकडे तिकडे फिरे. आईने त्याला सांगितले होते, 'जास्त लांब जाऊ नको. कोणाच्याही वस्तूला हात लावू नको.' तो नुसताच बाहेर फिरायचा, तेव्हा त्याच्या लक्षात आले, की पेशंटसोबत आलेले अनेक गोरगरीब भुकेने व्याकूळ होऊन इथे पैशांसाठी, अन्नासाठी दुसऱ्यांसमोर हात पसरतात. दुसरीकडे बरेच लोक जेवून शिल्लक राहिलेले अन्न कचराकुंडीत फेकून देतात. ते अन्न जर या गरजूंना मिळाले तर...! त्याने एक पुठ्ठा घेतला. त्यावर लिहिले - 'उरलेलं अन्न फेकू नका. मला द्या. मी ते उपाशी लोकांना देतो.' राजूने पुठ्ठ्याला दोरी बांधून ती गळ्यात अडकवली. राजूच्या गळ्यातली पाटी वाचून लोक राहिलेले अन्न त्याला देऊ लागले. बरेच अन्न जमा होऊ लागले.

Page No.
Date : / /

अ) दवाखान्यात सतत आईजवळ राहून इतरांना मदत करणारा योग्य पर्यायाला गोल कर. ①

१) विकास ④ शमसुद्दीन

२) राजू

३) इरफान

आ) 'कोणाच्याही वस्तूला हात लावू नको' असे आईने राजूला सांगितले असावे कारण ___ ②

इ). भुकेलेल्यांसाठी राजूने दवाखान्यात सुरू केलेला उपक्रम थोडक्यात लिही. ②

प्रश्न ३रा खालील कविता मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

माझ्या आज्यानं पंज्यानं

माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज इनल्या येसणी,
तुझ्या मातीने गोरपे
तवा करीती पेरणी.

माझ्या आज्यानं पंज्यानं
किती इनल्या गोफणी,
तवा नेमानं चालते
तुझ्या रानाची राखणी.

माझ्या आज्यानं पंज्यानं
रोज वळली चऱ्हाटं,
पाट भरून वाहयाची
तुझ्या रानातली मोटं.

माझ्या आज्यानं पंज्यानं
पोरं घातली सावलीला,
काटकाट्याच्या जिव्याला
दिस सोनियाचा आला.

अ) आजोबा - पणजोबांनी उनाड बैलांना काबूत ठेवण्यासाठी विणल्या — योग्य पर्यायाला गोल कर ①

Date: / /

① वेसणी ② चाबूक ③ सुली ④ गोफण

आ) कवीच्यामते आपल्या रानाचे- शिवाराचे रक्षण झाले कारण ②

इ) कष्टकरी जित्याला सोन्याचे दिवस येण्याचे श्रेय कवी आपल्या आजोबा- पणजोबांना देतो कारण- ②

प्रश्न. ४था- खालील वृत्तांत मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

किल्ले रायगड.

महाडपासून २५ किमीवर पाचड नावाच्या गावात वीरमाता जीजाऊंची समाधी आहे. या गावातून रोपवेने किल्ले रायगडावर जाता येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबाराच्या मागच्या बाजूला रोपवेचा पाळणा विसावतो. दरबारात शिरताच शिवाजी महाराजांचा मेघपुतळा मेघडंबरीखाली विराजमान झालेला आपणास दिसतो. दरबाराच्या मागील बाजूस राणीवसा आहे. वेगवेगळ्या कोठ्या आहेत. बाजूला राणी तलाव आहे. बाजारपेठेतून पुढे गेलेकी, महाराजांचा इमानी कुत्रा- वाघ्या याची समाधी आहे. तिथून पुढे वाघदरी आहे. टकमक टोक व हिरकणी बुरूज हे अत्यंत उंच कडे पाहून अचंबा वाटतो. रायगडाची सैर करण्यात धन्यता वाटते. वाटेत ग्रोणामध्ये ताजे निरसे दही मिळते. रायगड एक अवघड गड, शिवाजी महाराजांनी राजधानीचे ठिकाण निवडले. इथेच छत्रपतींचा राज्याभिषेक संपन्न झाला.

अ) वीरमाता जिजाऊंची समाधी असलेले ठिकाण – (योग्य पर्यायाला गोल कर) ①

① जुन्नर
② रत्नागिरी
③ पाचड
④ रायगड

आ) रायगड किल्ल्यावरील शिवाजी महाराजांच्या दरबाराचं वर्णन करणाऱ्या दोन बाबी लिही. ②

(P.T.O.)

Scanned by CamScanner

Date : / /

इ) शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत रायगडावर केलेल्या दोन वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी लिही. ②

प्रश्न५वा- खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.

अ) खालील वाक्यातील विशेषनाम व भाववाचकनाम ओळखून लिही-

1) निताच्या आवाजात गोडवा आहे. ②

विशेषनाम -

भाववाचकनाम -

आ) खालील वाक्यातील विशेषण ओळख व त्याचा वापर करून दुसरे वाक्य लिही. ②

1) समुद्रात प्रचंड लाटा उसळतात.

विशेषण -

वाक्य -

इ) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी कंसातील योग्य शब्दसमूह वापरून वाक्य पुन्हा लिही. ①

(सामोरे जाणे, प्राणांची आहुती देणे, कानोसा घेणे, टिपून मारणे)

1) आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी स्वतःच्या <u>प्राणांचा त्याग करणारे</u> शूर सैनिक आजही आपल्या देशात आहेत.

ई) पुढील वाक्य वाच. वाक्यांशी संबंधीत योग्य म्हण कंसातून निवडून लिही. ①

(एक ना धड भाराभर चिंध्या, अति तेथे माती, पालथ्या घड्यावर पाणी, दुरून डोंगर साजरे)

1) सविता कामे करते, पण, त्यातील एकतरी योग्य असेल तर शपथ! म्हणतात ना, ______

उ) खालील वाक्यातील सर्वनामांना अधोरेखित कर. ②

1) ही फुलांची माळ सुहासने बनवली.

2) आम्हांला प्रकल्प करायचा आहे.

ऊ) 'दार' प्रत्यय लावून शब्द तयार कर व लिही ①

Scanned by CamScanner

१) इमान —

१) वाक्यात योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिही. (1)
सर मी इरफान राजूचा मित्र

प्रश्न ६वा - निबंध स्पर्धेसाठी पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिही.
गुण (५)

1) आमची मुंबई स्वच्छ मुंबई (2) माझा आवडता खेळ
3) मी शिक्षक झालो तर.....

प्रश्न ७वा खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.
गुण - (५)

चांदण्या — मुले — सहल — गंमत.

Scanned by CamScanner

Page No.

Date : / /

श्रुतलेखनासाठी शब्द

1) प्रवाह

2) निशिगंध

3) चप्पाट

4) पाषाणमूर्ती

5) पशुपक्षी

6) वर्तुळ

7) सौराष्ट्र

8) वृक्षवेली

9) धावपट्टी

10) श्रीनगर

Scanned by CamScanner